कलम ४ (१ ) ( ख ) (xii)

परिपत्रक क्र. वैध/१३/कावि/६०९/२०२२ दि. २५/०७७/२०२२

दिनांक १५/०३/१९९६ रोजी अंध व्यक्तींच्या शिष्टमंडळाने मोफत वैद्यकीय सेवेच्या मागण्याबाबत मा.आयुक्त यांचे समावेत झालेल्या चर्चेमध्ये अंधाबरोबर अस्थी, मूकबधिर मतिमंद, आश्रम शाळेतील विद्यार्थिनी, गरीब निराधार रुग्ण, भूकंपग्रस्त अशा रुग्णांना वैद्यकीय सेवा देताना ४०% रुग्णांना मोफत रुग्णसेवे बाबतच्या सवलती देणे बाबत मान्यता निरस्त करण्यात आली आहे. तथापि बाह्य रुग्ण फी माफ करण्यात येऊ नये. आदेश क्रमांक वैद्य/७/कावि/२३०३/२००६ दि. ९/११/२००६ अन्वये सातकावी १ ) राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत दिले जाणारे उपचार सर्व रुग्णांना अंशत: किंवा पूर्णतः मोफत देण्यात यावेत. २) मनपा हद्दीतील रुग्णांना औषध उपचारासाठी फी माफी किंवा सवलत देताना वास्तव्याचा पुरावा म्हणून राशनिंग कार्ड, लाईट बिल ,टेलीफोन बिल, ओळखपत्र आणि योग्य तो मनपा हद्दीतील वास्तव्याच्या पुराव्याचे सत्यप्रत निस्तरीय ठेवावी. परंतु उपचार देताना कोणताही पुरावा मागू नये. ३) मनपा हद्दी बाहेरील सर्व प्रकारचे रुग्णांना मंजूर दर पत्रकाप्रमाणे औषध उपचार, रुग्ण सेवा देण्यात यावी. मनपा हद्दीबाहेरील सर्व प्रकारचे रुग्णांना फी माफी सवलत किंवा इतर कसलीही सवलत देता येणार नाही.४) मनपा अधिकारी कर्मचारी व पालिकेचे आजी-माजी नगर सदस्य व या सर्वांचे कुटुंब व्याख्यानुसार त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना मोफत उपचार सुविधा देण्यात याव्यात. ५) शहरातील दारिद्र्यरेषेखाली रुग्ण आपत्कालीन स्थितीतील रुग्ण (भूकंप, पूरग्रस्त, बेवारस, पत्रकार व वारकरी इत्यादी) ज्येष्ठ नागरिक , स्वतंत्र सैनिक सेवानिवृत्त कर्मचारी, पत्रकार, वायसीएम रुग्णालय येथे नियुक्तीस येणारे पोलीस कर्मचारी मानधन वरील व अन्यप्रकारे काम करणारे कर्मचारी (घंटागाडी, अंगणवाडी, डॉक्टर) यांना वैद्यकीय सेवा मोफत देण्यात यावे. ६) मनपा हद्दी बाहेरील असले तरी दारिद्र्यरेषेखालील ज्येष्ठ नागरिक, स्वतंत्र सैनिक यांना तसा पुरावा सादर केले नंतर औषधउपचार रुग्णसेवा देण्याचे मान्यता निरस्त करण्यात आली आहे . पिंपरी चिंचवड मनपा मा. सदस्यांचे शिफारशीच्या आधारे रुग्णसेवा बिलामध्ये 50% अथवा पूर्णतः रक्कम सवलत/ माफीचे/ अधिकार मा. सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना राहील ज्येष्ठ नागरिकांना वय 60 वर्ष व त्यावरील तसेच माजी राज्यस्तरीय खेळाडू, माजी राज्य राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू माजी सैनिक व मनपा हद्दीतील मतिमंद अपंग मूकबधिर व्यक्तींना पिंपरी चिंचवड मनपाचे रुग्णालय/ दवाखान्यात आवश्यक ते पुरावे सादर केले नंतर विनाशुल्क उपचाराचे सवलत देण्यास मान्यता देत आहे. मात्र केस पेपर फी + तपासणी फी माफ असणार नाही. ७) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत येणारे पिवळे/ केशरी रेशन कार्डधारक नागरिक वगळून इतर केशरी रेशन कार्डधारकांना नागरिकांना देण्यात आलेली मोफत सुविधा आदेश निरस्त करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner